**घटक क्र. ३:- खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे.**

**(नमुना प्रतिज्ञापत्र)**

## प्रतिज्ञापत्र/हमीपत्र

**विशेष कार्यकारी दंडाधिकारी सोलापूर**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रतिज्ञापत्र लिहून देणार | : ________________________ |
| | वय | : ________________________ |
| | धंदा/ व्यवसाय/ मजुरी | : ________________________ |
| | रा.ता. / जिल्हा | : ________________________ |
| २. | प्रतिज्ञापत्र लिहून घेणार | : सो.म.पा. तर्फे **श्री. श्रीकांत मायकलवार** नोडल ऑफिसर पी.एम.ए.वाय. तथा उपायुक्त, |
| | वय | : **५२** |
| | धंदा/ व्यवसाय/ मजुरी | : **नोकरी** |
| | रा.ता. / जिल्हा | : इंद्रभवन, सोलापूर |

**"सर्वांसाठी घरे" संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ................ अंतर्गत लाभ मिळणेकरिता प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की,**

१. मी अथवा माझ्या कुटुंबाच्या नावाने इतर कोणत्याही पर्यायाने किंवा इतर घटकाअंतर्गत अर्ज केलेला नाही व इतर कोणत्याही शासकीय व निमशासकीय आवास योजनेतून अर्ज केलेला नाही व लाभही घेतलेला नाही. तसेच मी दिवाळखोर (Insolvent/Bankrupt) व्यक्ती नाही.

२. मी मागास / इतर प्रवर्गातील आहे. (योग्य ते ठेवावे).

३. मी स्व: प्रमाणित करतो/करते की, माझ्या कुटुंबामध्ये एकूण____सदस्य आहेत. मी व माझ्या कुटुंबातील सर्व सदस्यांचे मिळून एकित्रत वार्षिक उत्पन्न रुपये (अंकात)__________रुपये (अक्षरी) ______________________________ इतके आहे.

४. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाकरीता (EWS) ३०० चौ. फुट एवढ्या चटई क्षेत्रफळाची सदनिका मी स्वतः खाजगी/शासनाच्या विकासकाकडून करून घेण्यास तयार आहे.

५. भारताच्या कोणत्याही भागात माझ्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या नावे पक्के घर नव्हते व नाही. भारताच्या कोणत्याही क्षेत्रात माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यांचे नावे पक्के घर/सदनिका आहे असे उघडकीस आल्यास शासनाची फसवणूक केल्याबद्दल माझ्या विरुद्ध भा.द.वि. कलम १९९/२००,४२० अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल व योजने मध्ये बांधकाम करण्यात आलेले शासनाचे पक्के घर/ सदनिका शासनाकडून ताब्यात घेतले जाईल याची मला पूर्णपणे जाणीव आहे व हे मला मान्य आहे.

६. या योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ मिळाल्यानंतर मी घर कोणत्याही व्यक्तीला कमीत कमी १५ वर्ष विकणार नाही व भाड्याने सुद्धा देणार नाही. जर अशा प्रकारे घडल्यास मी या हमीपत्राचा भंग केल्यासारखे होणार आहे व शासनाकडून माझ्यावर केलेली कारवाई मला मान्य राहील.

७. घरकुल घेण्याकरिता प्राप्त झालेले शासकीय अनुदान व बाकीची रक्कम स्वत: उभा करून मी घरकुल खरेदी करेन. सदर अनुदान इतर कोणत्याही कामावर खर्च करणार नाही. तसे आढळल्यास मी शासकीय नियमानुसार फौजदारी गुन्ह्यास स्वत: मी जबाबदार राहील.

८. मी सादर केलेली माहिती खोटी आढळल्यास, मी घरकुल योजनेचा लाभ मिळण्याकरिता अपात्र ठरविण्यात येईल याची मला जाणीव आहे व हे मला मान्य आहे.

९. मला अनुदान प्राप्त झाल्यानंतर मी संपूर्ण घरकुलाचे बांधकाम टप्याटप्याने पूर्ण करून घेईन व तसे न केल्यास संपूर्ण अनुदान परत करेन.

१०. योजनेअंतर्गत कब्जेवहीवाटीस मिळालेल्या घरकुलाची पुढील देखभाल व दुरुस्ती मी माझ्या स्वःखर्चाने करून घेईन.

११. आर्थिक दृष्ट्या दुर्बल (EWS) घटकाच्या योजनेअंतर्गत घर पूर्ण झाल्यावर योजनेचा नावासहित नामफलक घरकुल/घराच्या दर्शनीय भागात कायमस्वरूपी करारदर्शक कालावधीपर्यंत वर्षापर्यंत स्व:खर्चाने मी स्वतः लावून घेईन.

१२. मला सदर घरकुल आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) लाभार्थी म्हणून व रु. ३.०० लक्ष पर्यंत आर्थिक मर्यादा असलेल्या उत्पन्नाचा दाखला मी स्वत: प्रमाणित/प्रतिज्ञापत्र केलेला आहे. सदर उत्पन्नाचा दाखला खोटा आढळल्यास संपूर्ण अनुदान परत करेन व माझ्या विरुद्ध कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक:-

नाव व सही:-

**प्रतीज्ञार्थी**

ठिकाण:- सोलापूर

**सत्यापन**

**मी वर नमूद केलेली संपूर्ण माहिती माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर असून तरी त्याच्या सत्यतेकरीता मी सदर प्रतिज्ञापत्र करीत आहे. ती खोटी आढळल्यास त्यास मी भा.दं.वि. कलम १९९/२०० अन्वये शिक्षेस पात्र राहील. (या प्रतिज्ञापत्राचा मजकूर मला माझ्या मातृभाषेत वाचून दाखविला तो खरा व बरोबर आहे.)**

नाव व सही:-

**प्रतीज्ञार्थी**

**ओळख:-** १) पत्नी : ............................................................

२) मुलगा/मुलगी : ............................................................

**साक्षीदार:-** १) नाव व स्वाक्षरी : ............................................................

२) नाव व स्वाक्षरी : ............................................................